| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा ६/२०१८**<br>**दत्तात्रय रामचंद्र शेटे**<br>**वि.**<br>**भगवान तुकाराम शेटे** |

## नि. ६५ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी कागदपत्रांना निशाणी देण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, वादी यांनी नि. ३ सोबत अ. नं. १ येथे अस्सल संचकारपत्र, अ. नं. २ येथे वादीने प्रतिवादीला दिलेली नोटीस, अ. नं. ३ येथे प्रतिवादीने दिलेले उत्तर व अ. नं. ४ येथे दावा मिळकतीचा सातबारा उतारा दाखल केला आहे. वादींनी आपला सरतपास नि. ३६ वर दाखल केला असून सदरची कागदपत्रे शाबीत केली आहेत. तसेच सदर कागदपत्रांना निशाणी देण्याचे राहून गेले आहे. तसेच पुराव्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार वादींनी सदर कागदपत्रे शाबीत केली असल्याने दाव्याचा निर्णय गुणदोषांवर होणेकरिता न्यायाचे कारणाकरिता वादींनी नि. ३ सोबत सादर केलेल्या एकूण ४ कागदपत्रांना निशाणी देण्यात यावी ही विनंती केली. अंतिमतः वादीतर्फे वकील यांनी सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, सदरचे कामी दावा मिळकतीचा सातबारा उतारा सार्वजनिक कागद असल्याने त्यास निशाणी देण्यात यावी. तसेच नि. ३ सोबत अ. नं. ३ ला हजर केलेले प्रतिवादीने वादीचे नोटीसीस दिलेले

उत्तर व त्यातील मजकूर वादीने उलटतपासात मान्य केल्याने त्यास निशाणी देणेत यावी. वादीने हजर केलेला नि. ३ सोबत अ. नं. १ चे करारपत्र कायदेशीररित्या शाबीत झालेले नाही. तसेच त्यातील मजकूराबाबत वादी व त्याचे साक्षीदार यांचे जबानीत तफावत असल्याने ते शाबीत झाले नाही आहेत तरी त्यास निशाणी देणेस प्रतिवादींची हरकत आहे.

५. वादी यांचा अर्ज, प्रतिवादी यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. तसेच सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता तसेच प्रतिवादी यांचे म्हणणे विचारात घेता दावा मिळकतीचा सातबारा उतारा, वादीचे नोटीसीस प्रतिवादीने दिलेले उत्तर यास निशाणी देणे गरजेचे आहे असे वाटते.

७. वादी याने दावा हा दावा मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीपत्र होवून मिळणेकरिता तसेच वैकल्पीकरित्या दिलेली रक्कम परत मिळणेकरिता व कायम मनाईकरिता दाखल केल्याचे दिसून येत आहे. सदर कामी वादी याने त्याचे वकिलांमार्फत पाठविलेली नोटीस दिसून येत आहे. सदर नोटीसीवर सही व शिक्का दिसून येत आहे. त्यामुळे सदर नोटिसीस निशाणी देणे गरजेचे आहे असे वाटते.

८. सदर कामी वादी याने नि. ३ सोबत नोटरी संचकारपत्र जोडलेले आहे. सदर संचकारपत्राच्या अनुषंगाने वादी यांनी त्यावरील साक्षीदार शिवाजी माने हे तपासलेले दिसून येत आहेत. त्यामुळे भारतीय पुरावा कायद्यानुसार प्रकरणात आलेल्या पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन करणे गरजेचे आहे असे वाटते. त्यामुळे सदर अनुषंगाने करारपत्राला निशाणी देता येणार किंवा कसे याबाबतचा निर्णय हा अंतिम युक्तीवादाच्या वेळी घेणे योग्य होईल असे वाटते. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

# <u>आदेश</u>

१. वादी यांचा निशाणी ६५ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला आहे.

२. अनुक्रमांक २ येथे दाखल असलेल्या कागदपत्राला नि.६७ ,अनुक्रमांक ३ येथे दाखल असलेल्या कागदपत्राला नि.६८ , अनुक्रमांक ४ येथे दाखल असलेल्या कागदपत्राला नि.६९ देण्यात येत आहे.

सही/-

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

पन्हाळा.

पन्हाळा

दि. १८.०६.२०२६